**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**
Email Id – jdhepune@gmail.com Website – www.jdhepune.info
फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र. एनएसपी पोर्टल-२०२१-२२/(१३३३२/२१)/शिष्यवृत्ती/ 4182 दिनांक : १८.११.२०२१

**अत्यंत महत्वाचे / तात्काळ**

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कनिष्ठ / वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा.

**विषय : - उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्र शासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनेची NSP पोर्टलवरुन सन २०२१-२२ साठी प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत..**

संदर्भ : - मा. शिक्षण संचालनालयाचे ईमेलद्वारे प्राप्त पत्र क्र. उशिसं/शिष्यवृत्ती/पीएमएस/२०२१-२२/१३३३२ दि. १५.११.२०२१

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौध्द, पारशी व जैन या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिक्षणाकरीता केंद्र शासन पुरस्कृत मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजना सन २०२१-२२ साठी राज्यामध्ये राबविण्यात येत आहे. **या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना (११ वी ते पीएच.डी., व्यावसायिक, (डी.एड., बी.एड., एम.एड., आय.टी.आय.) सर्व डिप्लोमा अकरावी/ बारावी स्तरांवरील एम.सी.व्ही.सी.) या अभ्यासक्रमासाठी देण्यात येते.** विद्यार्थ्यांचे नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व शिष्यवृत्तीचे नुतनीकरण (Renewal) करण्यासाठी www.scholarships.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर शिष्यवृत्तीसाठी महाराष्ट्र राज्याकरीता नवीन (Fresh) शिष्यवृत्तीसाठी ४७५७५ संच निर्धारित केलेले आहे.

**सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षामध्ये केंद्र शासनामार्फत नवीन शिष्यवृत्तीसाठी व नुतनीकरणासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत दिनांक ३० नोव्हेंबर, २०२१ अशी निर्धारीत करण्यात आलेली आहे.** पोस्ट मॅट्रिक अल्पसंख्यांक शिष्यवृत्तीची सविस्तर माहिती, अर्ज करण्याची पध्दत, संकेतस्थळ, तसेच इतर अनुषंगिक माहितीबाबत संचालनालयाच्या वतीने राज्याच्या प्रमुख वृत्तपत्रांमधून जाहिरात देऊन त्यास प्रसिध्दी देण्यात आली आहे. तसेच सदर जाहिरात संचालनालयाच्या www.dhepune.gov.in संकेतस्थळावर आणि या कार्यालयाच्या www.jdhepune.info या संकेतस्थळावर सूचना देऊनही ऑनलाईन अर्जांच्या संख्येत वाढ होताना दिसून येत नाही. तसेच याबाबत केंद्रशासन व राज्य शासनाकडून विविध आढावा बैठकीमध्ये सर्व पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अर्ज भरणेबाबत कळविले आहे.

सर्व पात्र अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांनी नवीन / फ्रेश ॲप्लिकेशन करावे तसेच ज्या विद्यार्थ्यांना मागील वर्षी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्तीची रक्कम मंजूर झाली आहे अशा विद्यार्थ्यांनी रिनिवल / नुतनीकरणाचे ॲप्लिकेशन भरणे आवश्यक आहे. जास्तीत जास्त पात्र विद्यार्थ्यांनी या शिष्यवृत्तीचे लाभ घ्यावा याकरीता या शिष्यवृत्ती योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच यासंबंधित केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास त्वरीत सादर करण्यात यावा.

NSP Portal द्वारे सर्व महाविद्यालय / विद्यापीठ / संस्थांना Adhar Base लॉगीन करण्याची सुविधा देण्यात आलेली आहे. तसेच सन २०२१-२२ पूर्वी महाविद्यालयांनी KYC पूर्ण केले आहेत त्यांनी त्यांच्या NSP Portal वर Institute लॉगीन मध्ये आधार व मोबाईल नंबर नोंदणी (Register) करणे आवश्यक आहे. तसेच सन २०२१-२२ साठी नवीन महाविद्यालय / विद्यापीठ / संस्थांच्या KYC करण्याबाबतची प्रक्रिया NSP Portal च्या Home Page वरील Services Option वर Institute KYC Registration Form मध्ये देण्यात आलेली आहे. सदर Form भरल्यानंतर State Nodal Officer द्वारे सदरच्या भरलेल्या तपशीलाची पडताळणी करुन त्यांना ऑनलाईन पध्दतीने युजर आयडी व पासवर्ड मिळेल.

केंद्रशासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक योजनेपासून एकही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीबाबतची माहिती न मिळाल्यामुळे शिष्यवृत्तीपासून वंचित राहील्या त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापीठामधील विद्यार्थ्यांबाबत संबंधित विद्यापीठाचे कुलसचिव यांची राहील. याची सर्व महाविद्यालय / संस्था / विद्यापीठांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.

**(डॉ. किरणकुमार बोंदर)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

**प्रत माहिती व कार्यवाहीस्तव,**

**आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व इयत्तांच्या अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना तसेच पदविका अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना याबाबत कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना देण्याच्या आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.**

प्रति - १. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांना माहितीसाठी सादर.
२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे
६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
७. प्राचार्य, तंत्रनिकेतन व औद्योगिक प्रशिक्षण संस्था.
८. प्राचार्य, वैद्यकिय महाविद्यालये.
९. मा. शिक्षण उपसंचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, पुणे १.
१०. मा. शिक्षण उपसंचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, नाशिक.